# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

## कार्यवृत्त

**Minutes of Meeting**

**बैठक क्रमांक** : 203
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

ऑनलाईन/ऑफलाईन

**वार व दिनांक** : सोमवार, दिनांक 08 सप्टेंबर 2025
**(Day and Date)** : Monday, 08 September 2025

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## 203 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 202 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दिनांक 8 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी श्री. अनिल गावित नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिर्व्हसिटी, नवी दिल्ली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 07 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | | सदस्य |
| 08 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 09 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 10 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 11 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

## व्यवस्थापन मंडळ बैठक (ऑनलाईन / ऑफलाईन)

## Board of Management Meeting

विषय पत्रिका (Agenda)

सोमवार, दिनांक 08 सप्टेंबर 2025
**Monday, 8 September 2025**

वेळ – सकाळी 11.30 वाजता
**Time : 11.30 am**

| अनु.क्रमांक<br>Subject No. | | तपशील<br>Details |
|---|---|---|
| 203.1 | | **स्वागत**<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव श्री. दिलीप भरड यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| 203.2 | 203.2.1 | **दिनांक 12 जून 2025 रोजी झालेल्या 202 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 12 जून 2025 रोजी झालेल्या 202 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 203.2.2 | **दिनांक 12 जून 2025 रोजी झालेल्या 202 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 12 जून 2025 रोजी झालेल्या 202 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचा कार्यवाहीचा अहवाल सचिव श्री. भरड यांनी वाचून सभागृहाला अवगत करून दिले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 203.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 203.3.1<br>सेवा सुविधा कक्ष | **माजी कुलगुरूंना विद्यापीठाच्या विविध कार्यक्रमांना आमंत्रित करणेबाबत...**<br>**टिपणी** – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात वेळोवेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. या कार्यक्रमांच्या स्वरूपानुसार विद्यापीठाकडून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, शासकीय व विविध माध्यमांतील अनेक नामवंत, प्रतिष्ठीत व्यक्तींना आमंत्रण पाठविण्यात येते. भविष्यात अशाप्रकारे आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांना विद्यापीठाच्या माजी कुलगुरूंनाही आमंत्रण देण्यात यावे. अशा कार्यक्रमांना ज्या-ज्यावेळी माजी कुलगुरू उपस्थित राहतील त्या-त्यावेळी त्यांच्या प्रवासाचा खर्च विद्यापीठामार्फत अदा करण्यात यावा. तसेच त्यांचेसाठी विद्यापीठाच्या यश इन अतिथीगृहात राहण्याची सोय विनामूल्य करण्यात यावी याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : माजी कुलगुरूंना विद्यापीठात केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांना आमंत्रित करण्याचा प्रस्ताव स्तुत्य आहे. माजी कुलगुरूंचा तो सन्मान आहे. तसेच त्यांच्या प्रवासखर्चाबाबत त्यांच्या विद्यापीठात नमूद असलेल्या Home Town पासून विद्यापीठापर्यंत आणि विद्यापीठापासून Home Town पर्यंतचा त्यांच्या सोयीनुसार रेल्वे, विमान, स्वत:ची गाडी अशा कोणत्याही वाहनांद्वारे येणारा प्रत्यक्ष प्रवास खर्च देय असावा अशी सूचना मा. सन्माननीय सदस्यांनी केली. सेवासुविधा कक्षाने नमूद केलेल्या यश इन अतिथीगृहात विनामूल्य राहण्याच्या प्रस्तावालाही सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. परंतु प्रवास खर्च आणि राहण्याची विनाशुल्क सोय फक्त विद्यापीठाने त्यांना कार्यक्रमासाठी आमंत्रित केल्यानंतरच देय अयावी. त्यांच्या वैयक्तिक भेटीसाठी हा खर्च देय असू नये असेही सुचित करण्यात आले. |

| | |
|---|---|
| 203.3.2<br>स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन आणि प्रो. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र | **प्रो. राम ताकवले स्मृती व्याख्यान Endowment Fund तयार करण्यास मान्यता देणेबाबत...**<br>**टिपणी –** प्रो. राम ताकवले मेमोरियल व्याख्यान दरवर्षी आयोजित करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने ठराव क्र. 202.3.6 नुसार मान्यता देण्यात आली असून त्या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या Endowment Fund किती असावा यासाठी गठित केलेल्या समितीची बैठक आयोजित करून त्याचा अहवाल पुढील व्यवस्थापन मंडळात सादर करण्यात यावा असा ठराव झाला होता त्यानुसार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती सदर समितीच्या बैठकीने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. व्यवस्थापन मंडळाने ठराव क्र. 202.3.6 नुसार सुचित केल्यानुसार Endowment Fund साठी गठित केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालास व शिफारशीस मा. व्यवस्थापन मंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली.<br><br>तसेच मा. व्यवस्थापन मंडळाचे सन्माननीय सदस्य मा. जोशी सरांनी याविषयाच्या अनुषंगाने School Connect ही संकल्पना मांडली. याद्वारे शाळांमधून सामाजिक आणि राष्ट्र उभारणीसंदर्भातील विविध विषयांवरील निबंध स्पर्धा, व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात यावे. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राविषयीची, सामाजिक प्रश्नांविषयीची जागृती निर्माण होईल. या प्रस्तावातील सूचित उपक्रम अतिशय स्तुत्य असून सामाजिक बांधिलकीतून राष्ट्र हिताच्या जाणिवेसाठी उपयुक्त होईल असा विचार मांडण्यात आला. या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br><br>खर्चाच्या तरतूदीविषयी वित्त अधिकारी यांनी सुचविलेली पद्धती अमलात आणावी. केवळ खर्चाचे एक शीर्ष तयार करून त्यात तरतूद नमूद झाल्यास त्याप्रमाणे ह्या कामासाठी खर्च करणे सोयीचे होईल. या खर्चाची नियमावली, क्षेत्र, महाराष्ट्रभर, किती विद्यार्थ्यांचा समावेश असावा, योजना कशी राबवावी, विभागीय केंद्रांचा सहभाग करण्यासाठी खालील सदस्यांची समितीचे गठण करण्यात आले.<br>1) मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य श्री. नरेंद्र जोशी (अध्यक्ष)<br>2) डॉ. दिलीप धोंगडे, प्रमुख कुसुमाग्रज अध्यासन (सदस्य)<br>3) डॉ. रमेश वरखेडे (सदस्य)<br>4) डॉ. धनंजय वेळूकर (संचालक, नागपूर विभागीय केंद्र) (सदस्य)<br>5) मा. व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या डॉ. संजिवनी महाले (सदस्य सचिव)<br><br>ही योजना 'प्रो. राम ताकवले संशोधन विकसन केंद्रा'मार्फत राबविण्यात यावी. यासाठी येणाऱ्या खर्चाची प्रा. राम ताकवले संशोधन विकसन केंद्रातील अर्थसंकल्पीय तरतूदीत खर्चाचे एक शीर्ष समाविष्ट करून त्यातून या उपक्रमासाठी होणारा खर्च करावा असे सर्वानुमते ठरले. |
| 203.3.3<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचा 2024-25 वार्षिक अहवाल मा. व्यवस्थापन मंडळासमोर कार्योत्तर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** – दूरशिक्षण परिषदेच्या सूचनेनुसार दरवर्षी CIQA Annual Report हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दूरशिक्षण परिषदेच्या वेबसाईटवर अपलोड करावा लागतो. त्यानुसार वर्ष 2024-25 चा तयार करण्यात आला असून मा. कुलगुरू तथा अध्यक्ष मा. व्यवस्थापन मंडळासमोर कार्योत्तर मान्यतेस्तव सादर......<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राने वर्ष 2024-25 या वर्षाच्या वार्षिक अहवालास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी कार्योत्तर मान्यता प्रदान केली. |
| 203.3.4<br>सभा व दप्तर कक्ष | **दिपावली निमित्त सर्व नियमित शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी, करारावरील अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी व दैनंदिन वेतनावरील कर्मचारी यांना सानुग्रह देणेबाबत...**<br><br>**टिपणी** – वित्त समिती बैठक क्र. 16-2024-25 दि. 04 ऑक्टोबर 2024 च्या ठराव क्र. 14 नुसार मागील वर्षी 2023 मध्ये देण्यात आलेल्या रकमेत 10 टक्के वाढ करून तितकी रक्कम सन 2024 च्या दिपावलीनिमित्त सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात यावी. तसेच यानंतर सदरच्या रकमेत पुढील तीन वर्षांनी वाढ करता येईल असे ठरले. अशी शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाकडे करण्यात आली होती. वित्त समितीच्या ठरावास मा. व्यवस्थापन मंडळाने गतवर्षीप्रमाणे सन 2024 या वर्षात दि. 01 ऑक्टोबर 2023 ते सप्टेंबर 2024 पर्यंत किमान सहा महिने व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या नियमित व करारावरील शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी आणि करारावरील अधिकारी व कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत आस्थापना कक्षाकडून प्रस्तावित केल्यानुसार मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानात 10 टक्के वाढ करून खालीलप्रमाणे देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. |

| अ.क्र. | प्रकार | रक्कम | 10 टक्के वाढीसह |
|---|---|---|---|
| 01 | नियमित शिक्षक/ शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी | 35,000/- | 38,500/- |
| 02 | करारावरील अधिकारी व कर्मचारी | 30,000/- किंवा प्रत्यक्ष घेत असलेले दहमहा एकत्रित वेतन यापैकी जी कमी असेल ती रक्कम | रु. 30,000/- किंवा प्रत्यक्ष वेतन घेत असलेल्या रकमेत 10 टक्के वाढ करून जी कमी असेल ती रक्कम |
| 03 | दैनंदिन वेतनावरील कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी | 10,000/- | 11,000/- |

वित्त समितीच्या बैठक क्र. 16-2024-25 च्या ठरावाच्या शिफारशीनुसार सन 2025 व 2026 च्या दिवाळीकरिता सानुग्रह देण्याबाबतची प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – मा. व्यवस्थापन मंडळाच्या ठराव क्रमांक 196.3.2मध्ये नमूद केल्यानुसार या वर्षात वेगळी 10% वाढ न करता मागील ठरावाचीच अंमलबजावणी करून पुढीलप्रमाणे कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता प्रदान केली.

| अ.क्र. | प्रकार | रक्कम | 10 टक्के वाढीसह |
|---|---|---|---|
| 01 | नियमित शिक्षक/ शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी | 35,000/- | 38,500/- |
| 02 | करारावरील अधिकारी व कर्मचारी | 30,000/- किंवा प्रत्यक्ष घेत असलेले दहमहा एकत्रित वेतन यापैकी जी कमी असेल ती रक्कम | रु. 30,000/- किंवा प्रत्यक्ष वेतन घेत असलेल्या रकमेत 10 टक्के वाढ करून जी कमी असेल ती रक्कम |
| 03 | दैनंदिन वेतनावरील कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी | 10,000/- | 11,000/- |

तसेच ठराव क्रमांक 196.3.2 मध्ये नमूद केल्यानुसार मागील वर्षापासून पुढील तीन वर्षांनी सानुग्रह अनुदानात वाढ करता येईल असेही नमूद केले.

203.3.5
वित्त विभाग

**दि. 12 जुलै 2025 आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**

**टिपणी** – दि. 12 जुलै 2025 रोजी वित्त समिती आयोजित करण्यात आली होती. सदर वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – दिनांक 12 जुलै, 2025 रोजी झालेल्या वित्त समितीच्या सभा क्रमांक 22 च्या इतिवृत्तातील ठराव क्र. 01, 02, 03, 05, 06 यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**वित्त समिती सभा क्र. 22 विषय क्र. 04 ठराव :**

आस्थापना कक्षाकडून प्राप्त प्रस्तावाप्रमाणे विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी दि. 17 मे, 2025 रोजी दिलेल्या अर्जानुसार त्यांच्या सेवाकाळात डिसेंबर 2010 पासून कपात होणारी कर्मचारी कल्याण निधीची रक्कम त्यांना परत मिळावी याबाबत वित्त समितीने नेमलेल्या समितीसमोर सर्व कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष बोलावून निर्णय घेण्याच्या ठरावावर या सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. वित्त समितीच्या निर्णयानुसार समितीची बैठक घेऊन याबाबतचा निर्णय त्वरीत घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**वित्त समिती सभा क्र. 22 विषय क्र. 07 ठराव :**

विद्यापीठास आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये भराव्या लागणाऱ्या आयकर रकमेच्या बाबतीतील चालू असलेला आयकर न्यायाधिकरणासमोरील दावा विद्यापीठाच्या बाजूने लागल्याबद्दल व त्यानुषंगाने आयकर सल्लागार श्री. शरद शहा यांचे व्यावसायिक शुल्क रू. 7,25,000/- अधिक GST अदा करण्याबाबतचा घेतलेल्या निर्णयास या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**वित्त समिती सभा क्र. 22 कार्योत्तर विषय क्र. 01 ठराव :**

विद्यापीठ वित्त विभागाच्या Blockchain QR Code Platform प्रणाली राबविण्याबाबत घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा होऊन मान्यता प्रदान करण्यात आली. सदर कामासाठी ई-निविदा तयार करण्याकरिता नेमण्यात आलेल्या समितीने या कामाची व्याप्ती निश्चित केली होती. सदर निश्चित केलेल्या कामाच्या व्याप्तीनुसार निविदेचे वित्तीय मूल्यांकन निश्चित करण्यासाठी VNIT, Nagpur या संस्थेकडून सदर ई-निविदेचे वित्तीय मूल्यांकन निश्चित करून घेणे व त्यासाठी त्या संस्थेची व्यावसायिक फीस रू. 1,25,000/- अधिक GST यास वित्त समितीने दिलेल्या मान्यतेस मा. व्यवस्थापन मंडळाच्या या बैठकीत सर्वानुमते अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच सदर प्रणाली विद्यापीठाच्या वित्त विभागास अत्यंत उपयोगी ठरेल असेही मा. सदस्यांनी त्यांचे मत नोंदविले.

**वित्त समिती सभा क्र. 22 मा. कुलगुरू महोदयांच्या परवानगीने आलेले ऐनवेळचे विषय :**

**विषय क्र. 01 चा ठराव** : विद्यापीठाला ICSSR कडून प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू यांना मंजूर झालेल्या 'मेजर रिसर्च प्रोजेक्ट'च्या खर्चाच्या शीर्ष मंजूरीसाठी वित्त समितीने मान्य केलेल्या ठरावावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच रू. 2,09,00,000/- एवढ्या रकमेचा मेजर रिसर्च प्रोजेक्ट मा. कुलगुरू महोदय यांना ICSSR कडून मिळाला याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरू महोदय यांचे अभिनंदन केले. विद्यापीठात आतापर्यंतचा सर्वात मोठा प्रोजेक्ट मिळाल्याने NAAC मूल्यांकनाच्या प्रक्रियेत या प्रकल्पाचा विद्यापीठास मोठा फायदा होईल असेही सर्वांनी नमूद केले.

**विषय क्र. 02 चा ठराव** : विद्यापीठास शिंदी मेघे, ता. वर्धा येथील गट न. 129 मधील 10 एकर जमीन शासनाकडून प्राप्त झाल्याबाबत मा, कुलगुरू महोदयांचे सर्वानुमते अभिनंदन करण्यात आले. सदर जागेचा Counter Survey 1 X 1 मिटर सर्वे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास वित्त समितीने दिलेल्या मान्यतेस अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली.

मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेसमोर मा. कुलगुरू महोदय यांनी सदर जागा मिळवून देण्यासाठी मा. डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, तथा वर्धा व भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी पुढाकार घेऊन जमीन मिळवून देण्यासाठी मदत केली. त्याबद्दल मा. मंत्रीमहोदय यांचे सर्वानुमते अभिनंदन केले. तसेच सदर जागेवर विद्यापीठाचे विविध पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी त्या जागेवर सुसज्ज असे विविध इमारतीचे संकुल उभा करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, ज्यात पहिल्या टप्प्यात विभागीय कार्यालय इमारत व परिसर विकास, व्यावसायिक व उद्योजकता विकास केंद्र इमारत, शैक्षणिक इमारत, सुसज्ज ग्रंथालय, अभ्यासिका व संगणकीय लॅब इमारत, डिजिटल लर्निंग व दिव्यांगांसाठी प्रयोगशाळा इमारत, लॉजिस्टिक पार्क इमारत, ई-वाहन दुरुस्ती वर्कशॉप इमारत, स्वयंअध्ययन साहित्य भांडार इमारत, इत्यादी इमारतींसाठी एकूण 115 कोटी तर दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थी वसतीगृह इमारत (मुलींचे) विद्यार्थी वसतीगृह (मुलांचे), इंडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, विद्यार्थी भवन इमारत, अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने इत्यादीसाठी रू. 70 कोटी असे एकूण 185 कोटी पैकी विद्यापीठ पहिल्या टप्प्यात 25 कोटी तर दुसऱ्या टप्प्यात 15 कोटी असा स्वत:चा शेअर सदर खर्चासाठी वापरेल, तर शासनाकडून पहिल्या टप्प्यात 90 कोटी तर दुसऱ्या टप्प्यात 55 कोटी असे एकूण 145 कोटी सदर प्रकल्पावर अंदाजित खर्च अपेक्षित आहे. त्याप्रमाणे तातडीने शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 03 चा ठराव** : वित्त समितीने घेतलेल्या निर्णयानुसार मुदत ठेवीचे रोखीकरण करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली.

**विषय क्र. 04 चा ठराव : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठाने** Sapphirus Systems Pvt. Ltd. यांच्यासमवेत Block Chain Based Certification व YCMOU Yash Card तयार करून घेतले आहे. याची मालकी ही विद्यापीठ व Sapphirus Systems Pvt. Ltd. यांची असून, त्याचा वापर Sapphirus Systems Pvt. Ltd. यांनी इतर ठिकाणी वापर केल्यास विद्यापीठासाठी 10% Royalty मिळण्याच्या विषयावर सविस्तर चर्चा होऊन सदर MoU करण्यास अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली. सदरच्या बाबतीत विद्यापीठाने पेटंट घेण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. हा स्तुत्य उपक्रम राबविण्याकरिता विद्यापीठाचे वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक यांच्या योगदानाबाबत सर्व सन्माननीय सदस्यांकडून वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| | 203.3.6<br>वित्त<br>विभाग | **दि. 4 सप्टेंबर 2025 आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....** |

**टिपणी** — दि. 4 सप्टेंबर 2025 रोजी वित्त समिती आयोजित करण्यात आली होती. सदर वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव** — दि. 4 सप्टेंबर, 2025 रोजी झालेल्या वित्त समितीच्या इतिवृत्तावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेत विषय क्र. 1, 2, 3, 4, 5, 6, 8, 9, 10, 14, 15, 16, 19, 20, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 30, 31, विषयांवर चर्चा होऊन वित्त दिलेल्या मान्यतेस सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे खालील विषय व ठरावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

**वित्त समितीतील विषय क्र.** 07 : विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या गृहकर्ज व्याजावरील सबसिडी देण्याबाबत समितीमार्फत तयार करण्यात आलेल्या नियमावलीवर सविस्तर चर्चा होऊन नियमावली मान्य करण्यात आली व त्यानुसार गृहकर्ज व्याजावरील सबसिडी अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. सदर बैठकीत असे ठरले की, संबंधीत कर्मचाऱ्यांने त्यांचे गृहकर्ज खाते निरंक करून तसे बँकेचे प्रमाणपत्र विद्यापीठास सादर केल्यास व्याजावरील सबसिडीचा शेवटचा हप्ता हा त्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात देण्याचे ठरले. त्याचप्रमाणे सदरची गृहकर्ज व्याजावरील सबसिडी ही 2023-24 या आर्थिक वर्षापासून प्रलंबीत असल्याने सदर नियमावली ही आर्थिक वर्ष 2023-24 पासून लागु करण्यासही मान्यता प्रदान करण्यात आली.

**वित्त समिती ठराव क्र.** 11 : विद्यापीठात ठेकेदारामार्फत कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना देण्यात येणाऱ्या वेतनातील वाढीच्या अनुषंगाने वित्त समितीने घेतलेल्या निर्णयानुसार दरमहा रू. 1,23,720/- इतक्या प्रतिमहा खर्चास अंतिम मान्यता मा. व्यवस्थापन मंडळाच्या सदर बैठकीत प्रदान करण्यात आली.

**वित्त समिती ठराव क्र.** 12 :

**ठराव** : वित्त समितीच्या बैठकीत लेखापरीक्षकांनी विद्यापीठाच्या लेखा प्रणालीसंबंधी लेखा परीक्षकांचे अभिप्राय:

- विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीचे सत्य व आणि निष्पक्ष चित्र विद्यापीठ अधिनियम १९८९ नुसार असल्याचे अंकेक्षकाने नमुद केले आहे.
- विद्यापीठ प्रशासनाने यापूर्वीच्या लेखापरीक्षण अहवालातील सर्व परिच्छेद व अभिप्राय यावर अनुपालनात्मक कार्यवाही केली.
- विद्यापीठाने अधिग्रहित केलेल्या विविध प्रकारच्या मालमत्तांची विद्यापीठाच्या स्थापनेपासून ३५ वर्ष विविध मालमत्ता पडताळणी करून मालमत्ता निश्चित करण्यात आल्या.
- निश्चित केलेल्या मालमत्तेवर नियमानुसार घसारा आकारण्यात आला.

**लेखा व वित्त प्रणालीमध्ये करण्यात आलेले महत्वाचे बदल**

- विद्यापीठाच्या लेखा प्रणालीमध्ये Accrual System पूर्णतः लागू करण्यात आली.
- मुदत ठेवींवरील चालू वित्तीय वर्षासाठी मिळणारे व्याज प्रत्यक्षात पुढील आर्थिक वर्षात मिळते अशा व्याजाचे Accrued Interest या श्रेणीत लेखांकित करण्यात आले.
- शासनाची नवीन वित्तीय मानक कार्यप्रणाली (SOPs) स्वीकारण्यात आली.
- अनामत ठेव व सुरक्षा ठेवींच्या संदर्भात, सेवा पुरवठादारनिहाय याद्या प्रथमच तयार करण्यात आल्या.
- परीक्षा विभागाची प्रशासकीय कार्यक्षमता सुधारण्यासाठी नवीन परीक्षा स्टोरेज रॅक आणि शैक्षणिक विभागाकरिता व्हर्च्युअल क्लासरूम सेटअपची उभारणी करण्यात आली
- आर्थिक वर्ष 2024-25 पासून सर्व विभागीय केंद्रांना "वित्त वाहिनी" या संगणक DBT प्रणालीद्वारे परीक्षा आयोजन व मूल्यमापन देयके अदा करण्याची सुविधा देण्यात आली.

**लेखा परीक्षकांनी केलेल्या सूचना आणि शिफारशी**

- वित्त आणि लेखा विभागाचे कामकाज सुरळीत चालू असणेबाबत खात्री करण्यासाठी आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी अंतर्गत लेखापरीक्षण विभाग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली.
- वित्तीय व्यवहारांचे वाढते प्रमाण, वेगवेगळ्या योजना, इत्यादींच्या तुलनेत कुशल मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे गुणवता असलेले अनुभवी कर्मचारी नियुक्त करण्याची शिफारस करण्यात आली.
- विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या अभ्यासक्रमाच्या पुस्तक साठ्यासाठी केंद्रीकृत, एकात्मिक व्यवस्थापन प्रणाली लागू करणेबाबत सुचित करण्यात आले.
- प्रवेशित विद्यार्थी कमी होत असल्याने वित्तीय आवक यापुढे कमी होऊ शकते त्याकरिता विद्यार्थी नोंदणी वाढविण्यासाठी यापुढे विशेष प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे नमुद केले.
- विद्यापीठाच्या विविध न्यासांकरिता असलेल्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेतून संबंधीत न्यासांच्या प्रशासनासाठी होणारा खर्च जमा व्याजातून न करता त्यासाठी वेगळे लेखाशीर्ष तयार करून त्यातून खर्च करावा असे सुचविण्यात आले.

- सध्याच्या संगणक प्रणालीत अंकेक्षणाच्या मागणीनुसार अहवाल, एमआयएस अहवाल, वेतनाचे एक्सेलमध्ये अहवाल, इत्यादी अहवाल तयार करण्यास सक्षम करण्यासाठी प्रणालीचे अपग्रेडेशन आवश्यक असल्याचे नमुद केले.

**आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये वित्त विभागाने हाती घेतलेले प्रकल्प**

- आर्थिक वर्ष 2025-26 पासून सर्व विभागीय केंद्रांना "वित्त वाहिनी" या संगणक प्रणालीद्वारे विभागीय केंद्रांची दैनंदिन खर्चाची देयके थेट DBT प्रणालीनुसार अदायगी करण्याची सुविधा देण्यात आली आहे.
- वित्त वाहिनी या संगणक प्रणालीच्या DBT द्वारे समंत्रकांची देयके अदायगी सुरू करण्यात येणार आहे.
- विद्यापीठ स्थापनेपासून वित्त विभागातील सर्व प्रमाणके, देयके, बँक ताळमेळ पत्रके, महत्वाची कागदपत्रे स्कॅन करणे व संगणक प्रणालीद्वारे त्याची साठवणुक करणेकरिता संगणक प्रणाली तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले.
- विद्यार्थी सेवा विभागामार्फत अभ्यासकेंद्राने भरलेल्या शुल्कांचे बाह्य यंत्रणेद्वारे ताळमेळ घेणे व प्रक्रिया शुल्काची वसुली करणेबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली.
- वित्त विभागाचे सर्व सोयी सुविधायुक्त अशा नवीन प्रशासकीय जागेत स्थलांतर करण्यात येणार आहे.
- विद्यापीठाचे सर्व गेस्ट हाऊस तसेच विद्यापीठ पटांगण, सभागृह यांची ऑनलाईन पध्दतीने बुकींग सुविधा उपलब्ध करणेबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली.
- विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या पुस्तकांसाठी नवीन संगणक प्रणाली सुरू करून ती वित्त विभागाच्या प्रणालीसोबत जोडण्याचे काम सुरू करण्यात आले.
- AI based Block Chain enabled Finance Compliance Platform तयार करून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणेबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली.

उपरोक्त बाबतीत वित्त अधिकारी यांनी सादरीकरण केले. त्यानुसार सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते आर्थिक वर्ष 2024-25 चा अंकेक्षण अहवाल मान्य करण्यात आला. तसेच चर्चेत मागील चार वर्षांचे सरप्लस (उत्पन्न) विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली त्यात अंकेक्षण वर्षातील सरप्लसची रक्कम 287 कोटी असल्याचे नमुद करण्यात आले. मा. कुलगुरू महोदय यांच्या निर्देशानुसार समंत्रकांना त्यांच्या तासिकांचे दर शासनाच्या तासिका तत्वावरील प्राध्यापकांना अदा करण्यात येणाऱ्या दराप्रमाणे करणेबाबत विचारविनिमय झाला व त्यावर मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समितीचे गठन करण्यात आले.

| | |
|---|---|
| 01 मा. जोगेंद्रसिंह बिसेन, प्र-कुलगुरू | अध्यक्ष |
| 02 डॉ. व्ही. बी. गायकवाड. वरिष्ठ शैक्षणिक संयोजक | सदस्य |
| 03 डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य |
| 04 प्रा. सतीष हांडगे, केंद्रसंयोजक, K.T.H.M.महाविद्यालय | सदस्य |
| 05 डॉ. प्रकाश देशमुख, संचालक विद्यार्थी सेवा विभाग | सदस्य सचिव |

उपरोक्तप्रमाणे सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते अंकेक्षण अहवालास वित्त समितीने शिफारस केल्यानुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या सदर सभेत मान्यता प्रदान करण्यात आली.

**वित्त समिती ठराव क्र.** 13 : श्री. दिलीप भास्करराव भरड, मा. कुलसचिव यांच्या रजा रोखीकरणाबाबत वित्त समितीने घेतलेल्या ठरावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. व्यवस्थापन मंडळाच्या सदर बैठकीत असे ठरले की, वित्त समितीने घेतलेल्या ठरावातील विविध मुद्यांचा समावेश करून शासनाकडे रजा रोखीकरणाचा प्रस्ताव पाठवून मार्गदर्शन घ्यावे व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

**वित्त समिती ठराव क्र.** 17 : दि. 04 ऑगस्ट, 2025 च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीयकृत बँकेसोबत इतर बँकात निधी गुंतवणुकीकरिता खालील बँका पात्र असतील असे निर्देशित केले आहे.

| | |
|---|---|
| 01 ॲक्सीस बँक | 05 आयडीएफसी फर्स्ट बँक |
| 02 कोटक महिन्द्रा बँक | 06 फेडरल बँक |
| 03 इंडसइंड बँक | 07 बंधन बँक |
| 04 येस बँक | 08 एयु स्मॉल फायनान्स बँक |

09 महाराष्ट्र राज्य सहकारी बँक

याबाबतीत यापूर्वीही सदर विषय वित्त समितीच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. त्यावेळी केवळ सदर शासन निर्णयातील भारतीय रिझर्व बँकेने घोषीत केलेल्या Domastic Systimatically important Banks (D-SIBs) या प्रकारच्या बँकेत 1) ICICI Bank, 2) HDFC Bank, या दोन बँकांचा उल्लेख

सदर शासन निर्णयात केला असल्याने त्यांच्याकडे गुंतवणुक करणेबाबत वित्त समिती व मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे. त्यावेळी या दोन बँकांव्यतिरिक्त वरील बँकांमध्ये विद्यापीठाची गुंतवणुक करण्याबाबत नकार दिलेला आहे. या बँकांपैकी येस बँक यांच्याकडे काही विद्यापीठानी ठेवलेल्या रकमांची रिकव्हरीबाबत शासनस्तरावर तक्रारी झाल्या असून गुंतवणुक परत मिळण्यास अनेक अडचणी निर्माण झालेल्या होत्या.

दि. 22.08.2025 रोजी इंडसइंड बँकेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार त्यांच्याकडेही गुंतवणुक करण्याबाबतची विनंती केलेली आहे. याबाबत सविस्तर वित्त समितीच्या बैठकीत विनिमय होऊन वित्त समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने गुंतवणुक समितीच्या समक्ष टिपणीतील अनुक्रमांक 01 ते 08 मध्ये दर्शविलेल्या बँकांच्या प्रतिनिधींना बोलविण्यात यावे. सदर बैठकीत वित्त समितीच्या सदस्या डॉ. वाणी लातुरकर यांना बोलविण्यात यावे. तसेच खालील मुद्यांच्या अनुषंगाने त्यांच्याशी चर्चा करण्यात यावी.

01 उपरोक्त टिपणीतील अ.क्र. 01 ते 08 मधील बँकांकडे गुंतवणुक केल्यास गुंतवणुक रकमेवर विमा उतरवून देण्याबाबत.

02 बँकांच्या बाबतीत असलेले अनेक त्रुटींबाबत त्यांच्याकडून माहिती घेणे.

03 गुंतवणुक रक्कमेची बँक गॅरंटीबाबत.

04 बँकेच्या विश्वासार्हतेबद्दल असलेले प्रश्न विचारून माहिती घेणे.

वरीलप्रमाणे माहिती बँकांकडून घेऊन अहवाल तयार करण्यात यावा व सदरचा अहवाल मा. कुलगुरू महोदय यांना सादर करण्यात यावा असे वित्त समितीत ठरल्यानुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या या बैठकीत याबाबत सविस्तर चर्चा होऊन वित्त समितीत ठरल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच विद्यापीठाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

**वित्त समिती ठराव क्र.** 18 : सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. श्री. शरद शहा यांनी विद्यापीठाच्या आयकर अपील्सबाबत सविस्तर सादरीकरण केले. विद्यापीठाचे आयकर न्यायाधिकरणाकडे असलेले विद्यापीठाचे अपील्स विद्यापीठास जिंकुन दिल्याबद्दल मा. कुलगुरू महोदय यांनी विद्यापीठाच्या वतीने त्यांचे आभार मानले. तसेच श्री. हेमंत देशपांडे यांचेही आभार मानले. श्री शरद शहा यांच्या समवेत असलेले श्री. नितीन चांडक आणि श्री. रोहित तपाडिया यांचेही विद्यापीठाच्या वतीने मा. प्र-कुलगुरू यांनी आभार व्यक्त केले.

श्री. शरद शहा यांनी विद्यापीठाला कायमस्वरुपी आयकरातून सुट मिळविण्यासाठी आयकर कायदा 1961 मधील कलम 10(46)a या कलमानुसार आयकर कार्यालयाकडे प्रस्ताव देण्याबाबत सविस्तर सादरीकरण झाले. त्यावर चर्चा होऊन याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी स्वतंत्रपणे एक बैठक घेण्यात यावी असे मा. कुलगुरू महोदय यांनी सुचविले. वित्त समितीने घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करून सदर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**वित्त समिती ठराव क्र.** 21 : दि. 29 ऑगस्ट, 2025 रोजी झालेल्या बांधकाम समितीची बैठक क्र 184 च्या इतिवृत्तावर वित्त समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेनुसार सर्व विषय तसेच यापूर्वी झालेल्या सर्व बांधकाम समितीच्या इतिवृत्तातील विषयाबाबत बांधकाम विभागाने सादर केलेली तांत्रिक माहिती त्या-त्या बांधकामाच्या संदर्भाने असलेल्या सन्माननीय सदस्यांनी तांत्रिक व स्थापत्तीय दृष्ट्या तपासली असल्याचे संबंधीत विभागाने बांधकाम समिती बैठकीत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी जबाबदारीने प्रस्तावित केलेले असल्याने त्यानुसार अंतिम केलेले इतिवृत्त वित्त समितीच्या बैठकीत ठेवण्यात आले. त्यास संबंधीत विभागाच्या जबाबदारीवर वित्त समितीच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. त्यावर व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन त्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

**वित्त समिती ठराव क्र.** 29 : विद्यापीठाच्या स्थापनेपासून विविध विभागात तसेच विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्रावर जुनी विविध प्रकारची महत्वाची असलेली कागदपत्रे, नस्ती, दस्तऐवज इत्यादी असून त्याचे जतन करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सदरच्या सर्व नस्तींचे स्कॅनिंग करून ही सर्व कागदपत्रे संगणकीय प्रणालीद्वारे कागदाच्या आकारानुसार त्याचे स्कॅनिंग करून साठवणुक करण्याचे काम बाह्य यंत्रणेकडून करून घेण्यास व त्या कामाची ई-निविदा प्रसिध्द करून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. शासन स्तरावर याबाबतचे काही दर निश्चित करण्यात आले असल्यास त्याचीही माहिती घ्यावी असे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे निविदा तयार करण्यासाठी एक तांत्रिक समितीचे गठन करण्यात यावे. समितीमार्फत सदरच्या निविदांची छाननी करण्यात यावी असे ठरविण्यात आले. वित्त समितीमध्ये झालेल्या ठरावास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे सदरची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी असेही सर्वानुमते ठरले.

| | | |
|---|---|---|
| | | कार्योत्तर मान्यतेसाठी वित्त समितीमध्ये ठेवण्यात आलेल्या एकूण 03 विषयाच्या ठरावांवर सविस्तर चर्चा होऊन सदर ठरावांना मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>वित्त समितीच्या बैठकीत एनवेळच्या विषयाच्या ठराव क्र. 01, 02, आणि 04 वर सविस्तर चर्चा होऊन वित्त समितीच्या ठरावाप्रमाणे मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | | **वित्त समिती ऐनवेळचा ठराव क्र.** 03 : वित्त समितीने घेतलेल्या ठरावावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. वित्त समितीने घेतलेल्या ठरावाप्रमाणे प्रशासनाने संपुर्ण कार्यवाही करून अदायगीचे आदेश निर्गमित करून वित्त विभागास कार्यवाहीस्तव द्यावेत. असे सर्वानुमते ठरविण्यात आले. |
| 203.3.7 | सभा व दप्तर कक्ष | **विविध संस्थांशी केलेल्या सामंजस्य करारांना मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — विद्यापीठामार्फत बदलत्या काळानुरुप आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील अशा प्रकारचा विचार करून संबंधित क्षेत्रांत काम करणाऱ्या विविध संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्यात येत आहेत. त्यातीलच पुढील काही संस्थांशी केलेले सामांजस्य करार मा. व्यवस्थापन मंडळाला अवगत करून मान्येतेस्तव सादर ...<br>1. Srajan Vidyarat Pvt. Ltd. - B.Sc. Media Graphics and animation programme<br>2. Jawaharlal Nehru Port Autority (JNPA) Sheva, Navi Mumbai - Imparted training for improvement of skills in various trades based upon the need of port-based businesses and industries including SEZ. (Basic Driving Skills, Specialized Training & Advanced Safety Training)<br>3. BVG India Limited - JNPA and BVG will develop the infrastructure required for the driver training institute and to operate it jointly as per the MOU.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — वरील विविध संस्थांशी झालेल्या सामंजस्य करारांना सर्व सन्माननीय सदस्यांनी कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच कायद्यान्वये सामंजस्य ठराव शासनाकडे अवगत करण्यासाठी पाठविणेबाबत तरतूद असल्यास तशी कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात आले. |
| 203.3.8 | परीक्षा मंडळ | **दिनांक 02/09/2025 रोजीच्या परीक्षा मंडळ बैठक क्र. 57 मधील विषय क्र. 57.5.4 च्या गोपनीय प्रिंटरची नियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावाचा ठराव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — दिनांक 02/09/2025 रोजी परीक्षा मंडळ बैठक क्र. 57 आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील विषय क्र. 57.5.4 — च्या गोपनीय प्रिंटरची नियुक्ती करणेबाबतचा विषय सादर करण्यात आला होता. परीक्षा मंडळाने केलेला ठरावात केलेल्या शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव — विविध परीक्षांची** गोपनीय कामे करण्याकरीता जाहीर निविदा न मागविता गोपनीय व संवेदनशील अशा स्वरूपाची कामे करणाऱ्या 3 पेक्षा अधिक संस्थांकडून / प्रिंटरकडून दरपत्रके मागविण्यात यावी. मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने नेमण्यात आलेल्या समितीमार्फत दरपत्रकांची छाननी करून मा. कुलगुरू महोदय यांना अहवाल सादर करावा. त्यानंतर मा. कुलगुरू महोदय यांनी अंतिम मान्यता दिल्यास गोपनीय कामाचे कार्यादेश निर्गमित करण्यात यावे. या पध्दतीने होणाऱ्या कार्यवाहीस सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच परीक्षा मंडळाचे सदरचे इतिवृत्त चर्चा होऊन मान्य करण्यात आले. |
| 203.3.9 | आस्थापना कक्ष | **विद्यापीठात करारावर एकत्रित वेतनावर मनुष्यबळ नियुक्त करताना खालील परिनियम व कायद्यातील तरतुदींचा आधार घेतला जातो.**<br>1. **विद्यापीठ कायदा XX, 1989 मधील दुसरी अनुसूची, परिनियम 2 मधील 9 सी अंतर्गत तरतुदीनुसार** मा. कुलगुरूंना कमीत कमी सहा महिने आणि जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत नियुक्त्यांचे अधिकार आहेत. (सोबत कायद्याची प्रत जोडली आहे.)<br>2. **विद्यापीठ परिनियम क्र.** 11 (2 of 1993) अन्वये एकूण 3 वर्षे कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व एक वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करता येते. (सोबत परिनियमाची प्रत जोडलेली आहे.) |

| क्र. | नाव व पद | नेमणुकीचा कालावधी | वर्षे | शिल्लक कालावधी | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. संतोष शंकर बोडके<br>सहयोगी सल्लागार (प्रशासकीय वित्त विभाग) आज रोजी वय 65 वर्षे 1 महिना | दि. 05.01.2022 ते दि. 04.07.2022<br>दि. 05.07.2022 ते दि. 04.01.2023<br>**एकूण कालावधी कायदा (9 सी) नुसार**<br>दि. 05.01.2023 ते दि. 04.07.2023<br>दि. 05.07.2023 ते दि. 04.01.2024<br>दि. 05.01.2024 ते दि. 04.07.2024<br>दि. 05.07.2024 ते दि. 04.01.2025<br>दि. 06.01.2025 ते 05.07.2025<br>**एकूण कालावधी 11 (2 of 1993) नुसार** | 6 महिने<br>6 महिने<br>1 वर्ष<br><br>6 महिने<br>6 महिने<br>6 महिने<br>6 महिने<br>6 महिने<br>2.6 वर्ष | **मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने 1 वर्ष कालावधी पैकी 6 महिने कालावधी संपुष्टात 6 महिने कालावधी शिल्लक** | रु. 50,000/- |
| 2 | श्री. भंडारे विजय रामचंद्र<br>करारावरील लघुलेखक विद्यार्थी सेवा विभाग | दि. 17.07.2023 ते दि. 16.01.2024<br>दि. 09.02.2024 ते दि. 08.08.2024<br>दि. 09.08.2024 ते दि. 08.02.2025<br>दि. 10.02.2025 ते दि. 09.08.2025<br>**एकूण कालावधी 11 (2 of 1993) नुसार** | 6 महिने<br>6 महिने<br>6 महिने<br>6 महिने<br>2 वर्ष | **मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने 1 वर्ष कालावधी शिल्लक** | रु. 35,000/- |

उपरोक्त दोन्ही पुर्ननियुक्तीबाबतचा प्रस्तावास मा. कुलगुरूंनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली असून सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** — विद्यापीठ कायदा XX, 1989 मधील दुसरी अनुसूची, परिनियम 2 मधील 9 सी अंतर्गत तरतुदीनुसार श्री. संतोष शंकर बोडके यांच्या आणि विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये श्री. भंडारे विजय रामचंद्र यांच्या पुर्ननियुक्तीस मा. व्यवस्थापन मंडळाने कार्योत्तर मान्यता प्रदान केली.

**203.4 मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय**

203.4.1 आस्थापना कक्ष

**दिनांक 12.06.2025 रोजी झालेल्या 202व्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या ठरावानुसार नियोजन अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीवर भरण्यासाठीच्या आवश्यक कार्यवाहीस, या पदास अनुसरून अटी व शर्ती तसेच मान्य वेतन/भत्ते या विविध बाबींसह नेमणूक करण्याची कार्यवाही आणि मान्य करण्यात आलेल्या जाहिरातीचा आधार घेऊन, प्रतिनियुक्तीने नियोजन अधिकारी हे पद भरण्यासाठी आवश्यक सेवा प्रवेश अर्हता, कार्ये व अर्जाच्या प्रारूपास मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**

**टिपणी** — नियोजन अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीवर भरण्यासाठी त्यासाठीच्या अटी, शर्ती, सेवा प्रवेश अर्हता तसेच प्रतिनियुक्तीवर 'नियोजन अधिकारी' अर्ज, मा. व्यवस्थापन मंडळापुढे विचारार्थ आणि मान्यतेस्तव सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव** — नियोजन अधिकारी हे पद जाहिरात देऊन, प्रतिनियुक्तीवर भरण्यासाठी यापूर्वीच मान्यता दिली होती. सोबत दिलेल्या अटी, शर्ती, सेवा प्रवेश अर्हता यांना मान्यता प्रदान करण्यात आली.

**नियोजन अधिकारी या पदाकरिता सेवा प्रवेश अर्हता खालीलप्रमाणे आहे.**

- पदव्युत्तर पदवी बी प्लस श्रेणीमध्ये उत्तीर्ण (Master's degree in B+)
- व्यवस्थापनातील अतिरिक्त पदवी/पदविका (Additional Degree/ Diploma in Management)
- सरकारी/निमसरकारी/उद्योग अध्यापन क्षेत्रांत गट 'अ' मध्ये काम करण्याचा 15 वर्षांचा अनुभव (15 years' experience in teaching in Group 'A' in Government/Semi Government/Industry Sectors)
- नियोजन आणि विकास तसेच गुणवत्ता हमी क्षेत्रातील काम किंवा अभ्यासाचा पुरावे. (Evidence of work or study in the area of planning and development and Quality Assurance)

तसेच प्रतिनियुक्तीवर 'नियोजन अधिकारी' या पदाकरिता अर्ज मागविण्यास व अंतिम करण्याच्या प्रक्रियेस मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| | 203.4.2<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील करारावरील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेकडून विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये घेण्यात येणाऱ्या करारपत्रातील सुधारणेचा मसुदा मा. व्यवस्थापन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – विद्यापीठात करारावर एकत्रित वेतनावर मनुष्यबळ नियुक्त करण्यात येते. नियुक्तीनंतर या कर्मचाऱ्यांकडून करारपत्र भरून स्वाक्षरी घेण्यात येते. करारपत्रातील मसुदा विद्यापीठ परिनियम 11 (2 of 1993) अन्वये Statute of provide for Appointment of Persons of Fixed – Tenure Contract Basis in the University नुसार तयार केला होता. तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ बैठकीत 29 डिसेंबर 2011 ठराव क्र. ए-100/11/54 अन्वये किरकरोळ दुरुस्त्या करण्यात आल्या. परिनियमातील मुद्दा क्रमांक 10 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कराराच्या पहिल्या वर्षी कर्मचाऱ्याला अर्जित रजा देय नसून दुसऱ्या वर्षापासून कर्मचाऱ्याला 2½ रजा प्रतिमाह म्हणजे 30 रजा प्रती वर्षी देय आहेत अशी दुरुस्ती करून सदर परिनियम दुरुस्तीसाठी शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा असे मा. व्यवस्थापन मंडळाच्या ठरावात नमूद केले होते. परंतु परिनियमातील दुरुस्तीस शासनाकडून अद्याप मान्यता झालेली नाही. त्यामुळे प्रशासकीय संभ्रम आहे. सबब अस्तित्वातील परिनियमात आता विद्यापीठाच्या गरजेनुसार सुधारणा करण्यात आल्या असून सुधारित परिनियम मा. व्यवस्थापन मंडळांच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – यापूर्वीच्या परिनियमात करारावर घेण्यात येणाऱ्या वक्तींकडून घ्यावयाच्या बाँडपेपरमधील मसुद्याबाबत स्पष्टता नव्हती. तसेच जबाबदारीचा उल्लेख नव्हता. सबब प्रशासनाच्या मागणीनुसार मसुद्यात जबाबदारीचा उल्लेख करारपत्रात असणे. तसेच अद्याप अर्जित रजेबाबत दुरुस्ती परिनियमास शासनाच्या मंजुरी मिळेपर्यंत अर्जित रजा स्थगित ठेवण्यात आल्या आहेत. परंतु किरकोळ रजा देण्यात येत आहेत. परिनियमात अर्जित रजेबाबत दुरुस्ती होईपर्यंत करारावरील व्यक्तींना अर्जित रजा देय नसाव्यात अशी सुचना करण्यात आली. प्रशासनाने सादर केलेल्या करारपत्रातील मुद्दा क्रमांक 7 दुरुस्ती करून इतर सर्व मसुद्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 203.4.3<br>वित्त विभाग | **नंदिनी नदीच्या प्रदुषणमुक्ततेसाठी करावयाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी मुक्त विद्यापीठाने आर्थिक हातभार लावणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** – मा. विद्वत परिषद, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ सभेचे सन्माननीय सदस्य असलेले मा. महेश दाबक यांनी नाशिक मधील नंदिनी नदी पुनरूज्जीवन करणेसाठी रूपये एक कोटी पर्यंत वित्तीय सहायता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांचेकडून सहकार्य मिळणेसाठीचे पत्र मा. कुलगुरुंना सादर केले. सदर विषय हा धोरणात्मक बाबींचा असल्यामुळे विद्यापीठाची वैधानिक समिती मा. व्यवस्थापन मंडळ यांचे समोर मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – नाशिकमध्ये सदर बैठकीत सर्व सन्माननीय सदस्यांनी नंदिनी नदी पुनरूज्जीवन हा प्रकल्प अतिशय स्तुत्य आहे असे मत मांडले. आपल्या उपक्रमात सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी उपक्रमात सहभाग नोंदवावा आणि विद्यापीठाकडून रुपये एक कोटीचे अनुदान सदर प्रकल्पासाठी देण्यास तत्वत: मान्यता प्रदान केली. या उपक्रमात विद्यापीठाची कशाप्रकारे जबाबदारी, योगदान, सहभाग इ. असेल याबाबतची स्पष्टता यासंदर्भाने असलेल्या नंदिनी नदी पुनरूज्जीवन समितीकडून घेण्यात यावी असे ठरले. सदर प्रकल्पासाठी अनुदानातून आर्थिक पाठबळ देण्याविषयी नंदिनी नदी पुनरूज्जीवन समितीशी समन्वय साधण्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक समन्वय समिती मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने स्थापन करावी असे सुचित करण्यात आले. तसेच आर्थिक योगदानाविषयी अनुदान अदायगीची प्रणाली ठरविण्याचे सर्वाधिकार मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले आहेत. |
| | 203.4.4<br>203.4.5<br>203.4.6<br>प्रशासन विभाग | **मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 202.4.6 नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, 1989 मधील अ.क्र. 1 ते 4 अन्वये संवैधानिक अधिकारी असलेल्या कुलसचिव, वित्त अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक पदांच्या वेतनश्रेणी, सेवेच्या अटी व शर्ती, निवडीची कार्यपद्धती, सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ, इत्यादींसाठी तत्कालिन परिनियमात दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने केलेला ड्राफ्ट स्टॅट्युट मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 202.4.6 नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, 1989 मधील अ.क्र. 1 ते 4 अन्वये संवैधानिक अधिकारी असलेल्या कुलसचिव, वित्त अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक पदांच्या वेतनश्रेणी, सेवेच्या अटी व शर्ती, निवडीची कार्यपद्धती, सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ, इत्यादींसाठी तत्कालिन परिनियमात दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने केलेला कुलसचिव, वित्त अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक पदांचा ड्राफ्ट स्टॅट्युट मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – प्रशासनाने सादर केलेल्या ऐनवेळच्या विषय क्रमांक 203.4.4 परीक्षा नियंत्रक, विषय क्रमांक 203.4.5 वित्त अधिकारी आणि 203.4.6 कुलसचिव या विषयांबाबत असा ठराव करण्यात येतो की,<br>कुलसचिव, वित्त अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक पदांसाठी असलेल्या परिनियमाच्या मसुद्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. सादर मसुद्यावर सन्माननीय सदस्यांकडून दुरुस्त्या 10 दिवसात मागवाव्यात. आलेल्या दुरुस्त्या मा. कुलगुरू महोदयांना सादर कराव्या. सादर केलेल्या दुरुस्त्यांपैकी मा. कुलगुरू महोदय यांनी मान्य केलेल्या दुरुस्त्या परिनियमात कराव्यात व अंतिम झालेले परिनियम मा. राज्यपाल महोदयांच्या कार्यालयात मान्यतेच्या पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. |
| | | मा. व्यवस्थापन मंडळात सादर झालेल्या सर्व धोरणात्मक विषयांवर करण्यात आलेल्या चर्चेत ऑनलाईन व ऑफलाईन उपस्थित राहून धोरणात्मक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभाग घेतला. मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव श्री. भरड यांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सभा समाप्त झाल्याचे घोषीत केले. |

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**